जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर
दैनिक दिव्य मराठी 30/11/2022

**दिव्य मराठी विशेष** • 'महिला आयोग तुमच्या दारी'चे आयोजन, लव्ह जिहादवर कायदा सर्वानुमते व्हावा

# शहरात विशाखा समितीचे काम वेगाने व्हायला हवे

प्रतिनिधी | सोलापूर

सोलापूर शहरात विशाखा समितीचे काम वेगाने व्हायला हवे. लोकसंख्येच्या तुलनेत विशाखा समितीचे काम खूप कमी आहे, ग्रामीणमध्ये जवळजवळ नाहीच. त्यामुळे जिल्ह्यात सर्व स्तरावर विशाखा समिती सक्षम करण्यासाठी खाजगी आस्थापनांनादेखील सूचना देण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलिस प्रशासन आणि महिला आयोग मिळून काम करतील, अशी माहिती महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंगळवारी जिल्हा प्रशासनाच्या नियोजन भवन येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी उपायुक्त वैशाली कडुकर, उपायुक्त दिपाली काळे व इतर अधिकारी उपस्थित होते.

कामाच्या ठिकाणावर होणाऱ्या छळाच्या संदर्भात विशाखा समितीचे गठन होणे गरजेचे आहे. गठन झालेल्या समितीच्या माध्यमातून महिलांच्या तक्रारींचे निवारण व्हायला पाहिजे, मात्र सोलापुरात अशा समितींची संख्या बोटावर मोजण्याइतकीच आहे. ही संख्या वाढावी यासाठी सर्व स्तरावर सूचना आणि आदेश काढणार असल्याचे चाकणकर यांनी सांगितले. महिलांना वन स्टॉप सेंटरमध्ये आश्रय दिला जातो, सोलापुरात हे केंद्र शहराच्या बाहेर का, असा प्रश्न विचारल्यानंतर चाकणकर यांनी आम्ही लवकरच तो आधारगृह शहराच्या मध्यवर्ती भागात सुरू करणार आहोत, अशी माहिती दिली.



विशाखा समितीचे काम व्यापक करा जिल्हा प्रशासनाला महिला आयोगाच्या सूचना

**श्रद्धाच्या खुन्याला फाशी द्या :** लव्ह जिहादमधून घडलेला श्रद्धा वालकर हत्याकांडाचा प्रकार पाहता खुन्याला फाशी व्हायला हवी, असे चाकणकर यांनी सांगितले. मिसिंग सेल या पोलिसांच्या नव्या तपास यंत्रणेमुळे आपल्याला अशा प्रकारांपर्यंत जाणे शक्य होणार आहे. मात्र पुन्हा असे प्रकरण घडू नये म्हणून लव जिहादवर सर्व स्तरावरून विचार होणे गरजेचे आहे, असेही त्या म्हणाल्या.

**गर्भलिंगनिदान परीक्षण समितीमधील अधिकाऱ्याचा राजीनामा :** गर्भलिंग निदान परीक्षण जिथे होते त्याच्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार होऊ नयेत याकरिता गर्भलिंगनिदान परीक्षण समितीचे गठन करण्यात येते. या समितीच्या अधिकाऱ्यांनीच काही दिवसांपूर्वी राजीनामा दिल्यामुळे सध्या ते पद रिकामे आहे. अधिकाऱ्याची नेमणूक कधी होणार आहे किंवा यावर तोडगा कधी निघणार आहे असा प्रश्न विचारला असता लवकरच याबाबत तोडगा काढू आणि असे उत्तर त्यांनी दिले. कवठ्याच्या महिला सरपंच बेपत्ता होण्यावर त्यांचा शोध सुरू असल्याचे सांगून वेळ मारून नेण्याचा प्रकार चाकणकर यांनी केला. नियोजन भवन येथे आयोजित जन सुनावणीत ८१ समस्यांना वाचा फोडण्यात आली. महिलांनी सकाळपासून सायंकाळी चार वाजेपर्यंत आपल्या समस्या मांडल्या.

जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर

दैनिक पुण्यनगरी 30-11-22

# महिलांच्या सुरक्षिततेवरच विकासाचा आलेख : चाकणकर

## हिंसाचार, बालविवाह, अंधश्रध्दा अशा घटनांत वाढ

**सोलापूर / प्रतिनिधी**

राज्याच्या विकासाचा आलेख महिलांच्या सुरक्षिततेवर मोजला जातो. त्यामुळे महाराष्ट्र राज्य महिला आयोग महिलांची सुरक्षितता व सक्षमीकरणासाठी अविरत कार्यरत आहे. कौटुंबिक हिंसाचार, बालविवाह, अंधश्रद्धा, माता व बालमृत्यु अशा घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. अशा घटना रोखणे आपल्या सर्वांसमोर आव्हान असून, सर्वांनीच एकजुटीने त्याचा सामना करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी केले.

मंगळवारी, नियोजन भवन सभागृहात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर पोलीस आयुक्त डॉ.राजेंद्र माने, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव नरेंद्र जोशी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी डॉ. विजय खोमणे, जि.प.चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, तहसीलदार अंजली मरोड आदी उपस्थित होते.



'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमात महिलांच्या तक्रारी जाणून घेताना अध्यक्षा रुपाली चाकणकर.

अत्याचार, अन्यायग्रस्त पीडितेला स्थानिक पातळीवर तातडीने न्याय देण्याच्या उद्देशाने 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**तीन पॅनेलमध्ये जनसुनावणी घेण्यात आली. यासाठी जिल्ह्यातून पॉक्सो, मालमत्ता विषयक, कामाच्या ठिकाणी मानसिक छळ, कौटुंबिक अशा विविध एकूण ८१ तक्रारी प्राप्त झाल्या. प्राप्त तक्रार अर्ज संबंधित यंत्रणांकडे वर्ग करून, त्यावर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या जनसुनावणीवेळी पोलीस, प्रशासन, विधी सल्लागार, समुपदेशक, जिल्हा समन्वयक उपस्थित होते.**

वर्षानुवर्षे न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या महिला, मुली, तरुणी, बालिकांना याद्वारे न्याय देण्याचा प्रयत्न आहे, असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अतुल वाघमारे, जिल्हा परिविक्षा अधिकारी वैशाली भोसले, परिविक्षा अधिकारी नितीन इरकल, नितीन जाधव, दीपक धायगुडे आदींनी परिश्रम घेतले.

जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर

दैनिक पुढारी दि. 30-11-22

# खासगी एक हजार आस्थापनांना महिला सुरक्षेसंदर्भात नोटिसा

## महिला आयोगाच्या अध्यक्षा चाकणकर यांची माहिती



**सोलापूर : पुढारी वृत्तसेवा**

शासकीय व निमशासकीय कार्यालयांत काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या तक्रार निर्मूलनासाठी राज्य शासनाच्या आदेशानुसार तक्रार निवारण समिती कार्यरत आहेत. सोलापूर जिल्ह्यात असलेल्या एकूण १०५ शासकीय व निमशासकीय कार्यालयांत या समित्या आहेत. मात्र जिल्ह्यातील उर्वरित एक हजार ४५ खासगी आस्थापनांच्या ठिकाणी महिला दक्षता समित्या नाहीत. त्यामुळे या आस्थापनांस समिती स्थापन करण्यासाठी एक महिन्याची मुदत देत आहेत, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी मंगळवारी दिली.

अध्यक्षा चाकणकर यांनी मंगळवारी सात रस्ता येथील नियोजन भवनात महिला तक्रारींबाबत जनसुनावणी घेतली. यानंतर त्या बोलत होत्या.

सोलापूर जिल्ह्यात २०० मुली, ९०४ महिला बेपत्ता असल्याच्या तक्रारी

पान २ वर›

## खासगी एक हजार अस्थापनांना महिला सुरक्षेसंदर्भात नोटीसा

आहेत. बेपत्ता महिलांपैकी ५५० जणींचा शोध लागला आहे. मात्र महिलांच्या बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढत असल्याची खंत चाकणकर यांनी व्यक्त केली. बेपत्ता महिला व मुलींचा मिसींग सेलच्या माध्यमातून युद्धपातळीवर शोध घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यात तब्बल ६९ बालविवाहाच्या तक्रारी आहेत. बालविवाह रोखण्याचा प्रयत्न यंत्रणेकडून करण्यात आला आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध सर्वजण दक्ष राहणे आवश्यक असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. जिल्हा परिषदेने सायकल बँक उपक्रम राबवून मुलींची शाळेतील गळतीचे प्रमाण कमी केले आहे. ग्रामीण भागात शाळेपासून दूर असणाऱ्या मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सुरू केलेली सायकल बँक योजना कौतुकास्पद आहे. यासाठी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांचे अभिनंदन. असा उपक्रम राज्यात सर्वत्र राबविला जाण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही चाकणकर यांनी यावेळी सांगितले.